रविवार दि.९ जून २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २८१
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

## श्रीकांत शिंदे यांना मंत्री करण्याची मागणी

# शिवसेनेच्या नवनिर्वाचित खासदारांचा मुख्यमंत्रीएकनाथ शिंदे यांच्याकडे आग्रह

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. त्यांच्या मंत्रिमंडळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला देखील दोन मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. यामध्ये एक कॅबिनेट आणि एका राज्यमंत्रिपदाचा समावेश असेल. या दोन मंत्रिपदावर कोणाची वर्णी लागणार? याची चर्चा सुरू असतानाच एकनाथ शिंदे यांच्या निवडून आलेल्या खासदारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र आणि नवनिर्वाचित खासदार श्रीकांत शिंदे यांना मंत्री करण्याची मागणी केली आहे.

लोकसभा निवडणूक निकालानंतर आता केंद्रात सत्तास्थापनेच्या हालचाली सुरु आहेत. उद्या सायंकाळी नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. त्यांच्यासोबत भाजप आणि एनडीएमधील सहकारी घटक पक्षांचे खासदार देखील मंत्रिपदाची शपथ घेतील. यात शिवसेनेच्या वाट्याला येणाऱ्या मंत्रिपदामध्ये श्रीकांत शिंदे यांचा समावेश करावा अशी मागणी शिवसेनेच्या सर्व खासदारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी ही सर्वांचीच इच्छा असल्याचे म्हटले आहे.एकनाथ शिंदे यांच्या सात खासदारांनी विजय मिळवला आहे. या खासदारांनी नुकतेच श्रीकांत शिंदे यांची शिवसेनेचे लोकसभेतील गटनेतेपदी नियुक्ती केली आहे. आता या तरुण खासदाराला मंत्रिपद द्यावे अशी विनंती शिवसेनेच्या खासदारांनी मुख्यमंत्र्यांकडे देखील केली आहे. काल शिवसेनेच्या सर्व खासदारांची दिल्लीत बैठक झाली. या वेळी या बैठकीत खासदारांनी मुख्यमंत्र्यांकडे श्रीकांत शिंदे यांच्या मंत्रिपदासाठी आग्रह धरला आहे. त्यामुळे आता श्रीकांत शिंदे यांना केंद्रात मंत्रिपद मिळते का? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. याचा सर्वस्वी निर्णय हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना घ्यावा लागणार आहे.शिवसेनेच्या विजयी खासदारांमध्ये बुलढाण्याचे प्रतापराव जाधव, मावळचे खासदार श्रीरंग बारणे, हातकणंगलेचे धैर्यशील माने, छत्रपती संभाजीनगरचे संदीपान भुमरे, मुंबई उत्तर पश्चिमचे रविंद्र वायकर असे सर्व वरिष्ठ नेते आहेत. यातील एका नेत्याला मंत्रिपद दिले तर वाद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाद नको, म्हणून श्रीकांत शिंदे यांच्या नावाचा पर्याय निवडला जाण्याचीही शक्यता वर्तवली जात आहे.



## सोलापुरात वीज पडून दोघांचा मृत्यू शेळ्याही दगावल्या ; एकजण जखमी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सोलापूर । प्रतिनिधी**




सोलापुरात शुक्रवारी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास अचानकपणे जोरदार पाऊस पडला. विजेच्या कडकडाटासह हा पाऊस होता. शहराच्या जवळील वेगवेगळ्या गावामध्ये वीज कोसळल्याच्या घटना घडल्या असून दोघांचा मृत्यू झाला आहे तर १ व्यक्ती जखमी, तसेच २ शेळ्याही दगावल्या आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यातील गुर्देहळ्ळी गावात वीज कोसळ्याने अमसिद्ध गायकवाड वय ६७ यांचा मृत्यू झाला तसेच गायकवाड यांच्या २ शेळ्याही दगावल्या आहेत. कुंभारी गावात शारदा सुतमील जवळ 'बिळेणी डक्के' पुजारी या ४८ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू वीज पडल्यानेच झाला असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालय अर्थात सिव्हिल हॉस्पिटलला पाठवल्याची पोलिसांकडून माहिती मिळाली. तर दोड्डी गावात वीज कोसळल्याने शंकर तुळशीराम राठोड हे ६९ वर्षीय वृद्ध व्यक्ती जखमी झाले आहेत. जखमी शंकर राठोड यांच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहे.

## विश्व पर्यावरण दिना निमित्त ब्रह्माकुमारीज कडून वृक्षारोपण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



कंधार येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय,उपसेवा केंद्र कंधार येथे ओम शांती केंद्रामध्ये दि.०६ जुन रोजी यांच्याकडून विश्व पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,

या कार्यक्रमांतर्गत प्रामुख्याने 'प्लास्टिक प्रदूषण का समाधान एक झाड एक जीवन 'जल ही जीवन है ' आणि वायु प्रदूषणाला कमी कसे करता येईल, इत्यादी विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यानिमित्य ब्रह्माकुमारी ज्योती बहीनजी यांनी आपल्या जीवनामध्ये झाडे किती उपयोगी आहेत,तथा वर्तमान काळात आपल्या जीवनामध्ये पाण्याचे किती महत्व आहे,त्याचबरोबर निसर्गाला सशक्त शुद्ध करण्यासाठी प्लास्टिकचे प्रदूषण कसे टाळता येईल यावर मार्गदर्शन केले.

यावेळी कार्यक्रमांसाठी डॉ.लक्ष्मीकांत पेठकर,बी.के सतीश भाई,बी.के शिवराम पांडागळे भाई,बी.के ओंकार भाई,बी.के साईनाथ भाई, आयुष बच्चेवार,बंकवाड सर, गौरव,साईनाथ,महाजन,बीके शकुंतला माता,बीके चंद्रकला माता,बी.के कमल माता,बी.के पद्मावती रहाटकर माता, बीके सुनंदा गोंड माता,अनुसया माता, मीरा माता तेलंग,संगीता माता जायभाये, डॉ.डांगे मॅडम,मीरा, अश्विनी बच्चेवार, नम्रता, नंदिनी, ईश्वरी,श्रावणी,जान्हवी, इत्यादींनी सहकार्य देऊन कार्यक्रम संपन्न केला.

### अखेर वनवास संपला

## संदिप खाकाळ यांच्या प्रयत्नातून वाघुले वस्ती रस्त्याचे स्वप्न साकार



लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

गावाचे नंदनवन करण्याचे ध्येय उराशी बाळगून शेरी बु सरपंच युवानेते संदिप खाकाळ यांनी माजी राज्यमंत्री आ.सुरेश धस यांच्याकडे सतत पाठपुरावा करून आपल्या गावाचा विकास कसा करता येईल? यासाठी अहोरात्र प्रयत्न करत असल्याने गावकरी समाधान व्यक्त करताना दिसत आहेत.

याविषयी सविस्तर माहिती अशी की,शेतीमधील कमी होणारी मनुष्यबळाची उपलब्धता लक्षात घेता शेतीची कामे करताना यंत्रांचा उपयोग वाढला आहे. यांत्रिकीकरणामुळे शेतीमध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी व इतर कामे करण्यासाठी,यंत्रसामुग्री शेतापर्यंत नेण्यासाठी आणि शेतीमाल बाजारात पोहचविण्या करीता बारमाही शेतरस्त्यांची आवश्यकता असते.असे रस्ते तयार करून शेतकऱ्यांना सुविधा देण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राज्यात 'मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.शासनाच्या या योजनेचा लाभ आपल्या गावातील लोकांना झाला पाहिजे त्यातून मजुरांच्या हाताला काम मिळाले पाहिजे व ज्या ठिकाणी रस्त्याची गरज आहे त्याठिकाणी रस्ता करण्यासाठी सरपंच संदिप खाकाळ हे सतत प्रयत्न करीत होते आज त्यांच्या सततच्या पाठपुराव्याने मंजूर झालेला अतिशय महत्त्वाचा व अनेक वर्षांपासून प्रलंबित केरूळ रोड ते वाघुले वस्ती पांदण रस्त्याचे आज श्री.संदिप साहेब खाकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. दशरथ (तात्या) गोरे व श्री.राहूल गोरे यांच्या हस्ते उद्घाटन करून रस्त्याला सुरुवात करण्यात आली. यावेळी उपसरपंच दिपक दादा सोनवणे,शिवाजी डोरले,परशुराम शिरोळे,चेअरमन नवनाथ वाघुले, दयानंद भालेकर,शिवाजी कन्हेरकर, बबन वाघुले, अमोल वाघुले, ज्ञानेश्वर गोरे, यांच्यासह इतर नागरिक उपस्थित होते.

# अनंत मुंडे यांच्या कवितेचा विद्या पीठाच्या अभ्यासक्रमात समावेश

## साहित्याच्या क्षेत्रात परळीची गरुडझेप

लोकनेता न्यूज नेटवर्क

**परळी । विजय रोडे**

सामाजिक,राजकीय आणि विविध क्षेत्रात सतत चर्चेत असलेल्या परळी शहराचे नाव साहित्य क्षेत्रात सुद्धा एका उंचीवर नेण्याचे काम इथल्या साहित्यिक मंडळींनी केले आहे.परळीला साहित्यिकांचा समृद्ध वसा आणि वारसा लाभलेला आहे मधु जामकर, राजेश्वरराव देशमुख, आबासाहेब वाघमारे आणि अलीकडच्या काळात डॉ.राजकुमार यल्लावाड, प्राचार्य अरुण पवार, प्रा. संजय आघाव, दिवाकर जोशी, सिद्धेश्वर इंगोले,बालाजी कांबळे यांच्यासह मराठवाड्यामध्ये सक्रिय असणाऱ्या परळी मसापच्या शाखेने हे वेळोवेळी आपल्या उपक्रमातून आणि साहित्य संमेलनातून तसेच विविध साहित्यिक कार्यक्रमात भरीव योगदान देऊन सिद्ध केलेले आहे.



याही पुढे जाऊन परळीच्या साहित्य क्षेत्राचे नाव एका उंचीवर नेण्याचे काम येथील भगवान प्राथमिक शाळेत कार्यरत आसलेले आदर्श शिक्षक, कवी,शाहीर अनंत मुंडे यांनी केले आहे.

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी,नामवंत शाहीर म्हणून त्यांनी महाराष्ट्रभर परळीचे नाव केले आहेच शिवाय यावर्षीपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी त्यांच्या शेतकरी राजा या कवितेची निवड झाल्याने साहित्याच्या प्रांतात परळीची एक वेगळी ओळख निर्माण करण्याचे काम कवी अनंत मुंडे यांनी केले आहे. बालकवी, बहिणाबाई चौधरी, विंदा करंदीकर, शांता शेळके, भारतकुमार गायकवाड यांच्या निवडक कवितांच्या मांदियाळीमध्ये अनंत मुंडे यांच्या शेतकरी राजाया कवितेची निवड होणे म्हणजे परळीच्या साहित्य क्षेत्रासाठी फार मोठी सन्मानाची बाब आहे.अनंत मुंडे यांच्या या यशस्वीते बद्दल साहित्य तसेच राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### पै.अमोल राजे शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून वाढदिवस साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

जेष्ठ सामाज सेवक बबन दादा शिंदे यांचे चिरंजीव राजे संभाजी उद्योग समूहाचे अध्यक्ष युवा नेते अमोल राजे शिंदे यांचा वाढदिवसानिमित्त जि.प.प्रा.शाळा येथे शालेय विद्यार्थ्यांना वह्या,पेन वाटप करून उत्साहात वाढदिवस साजरा करण्यात आला यावेळी युवा नेते व आमदार सुरेश आण्णा धस यांचे चिरंजीव जयदत्त धस,युवा नेते महेश हंबर्डे,सरपंच श्याम भैय्या धस,सतीश जगदाळे,सलीम पठाण,राहुल वारंगुळे,सरपंच बिभिषण भवर,बाळू गव्हाणे महेश खकाळ,वाल्मिक तोडकर, सोमनाथ तोडकर,परमेश्वर शेवाळे,राहुल सोले,विनायक पन्हाळकर,प्रकाश शिंदे,गोपीनाथ टकले,पत्रकार शेख निसार, पत्रकार जावेद पठाण,पुरोगामी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष अण्णासाहेब साबळे,उपध्यक्ष दादासाहेब पवळ,पत्रकार शेख समीर पत्रकार शेख कासम,पत्रकार संतोष नागरगोजे, यांच्यासह आदी उपस्थित होते अजूनही विविध क्षेत्रातून अमोल राजे शिंदे यांच्यावर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सोशल मीडियावरून शुभेच्छा वर्षाव होताना दिसत आहे.



## चारोळी

**तू बरसतोस तेंव्हा**
**मनीचा मोर नाचत राहतो**
**तू सखा होऊनी जातोस अन**
**तुझ्यात एकरूप होऊनी वाहतो.**


रंजना सानप
मायणी (सातारा)

## जरांगे यांचे उपोषण सुरू

**जालना (वृत्तसंस्था)**–मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या आमरण उपोषणाला आजपासून सुरुवात झाली आहे. पोलिसांकडून या उपोषणाला परवानगी नाकारण्यात आली आहे. मात्र तरीही मनोज जरांगे हे उपोषणावर ठाम आहेत. मी उपोषण करणारच असे जरांगे यांनी स्पष्ट केले आहे. तसेच प्रसार माध्यमांशी बोलतांना त्यांनी सगेसोयरेची अधिसूचना करण्याची मागणी केली आहे.यावेळी ''आता मराठा आरक्षण दिले नाही तर विधानसभेत मी स्वतः नाव घेऊन उमेदवार पाडणार असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे.

## संपादकीय

# मन करा थोर...



लोकनेता न्यूज नेटवर्क

आपल्या सुखाच्या, आनंदाच्या कल्पना अवाढव्य नसतील तर जीवनातील अर्ध्याअधिक समस्या आपसूकच भंग पावतात. माझा जन्म कोकणातला. जीवन कष्टप्रद. पोटाची खळगी भरण्याची भ्रांत. पण एखाद्या भरभरून आंबे लागलेल्या झाडावर दगड मारल्यानंतर झाडावरचा एखाद् दुसरा आंबा जरी वाट्याला आला तरी आनंद गगनात मावेनासा व्हायचा. घरात काही खायला असो वा नसो, रानात सहज फिरायला गेल्यावर तेथे मिळणारा काजू बोंडे, जांभळे, करवंदे हा रानमेवाही कोणत्याही मिष्टान्नापेक्षा स्वादिष्ट लागायचा. जीवनात बरेच काही दुरापास्त असणारी मुलेच सर्वांत जास्त आनंदी असतात; कारण मुळात त्यांच्या आनंदाच्या कल्पना फार मोठ्या नसतात. असेच काहीसे माझ्याबाबतीत होत गेले. जे मिळेल त्यात समाधान मानत वयाबरोबरच समजुतीनेही मोठा झालो.

मी आठ वर्षांचा असताना मुंबईत आलो व वरळीला एका झोपडीवजा घरात वयाची पंचविशी पूर्ण केली. तशी आनंदातच. मला आठवते, साधारण बारा ते तेरा वर्षांचा असताना राजेश खन्ना या सुपरस्टारचा बिलकुल न चाललेला किंबहुना आपटलेला ‘बंधन’ हा मी पाहिलेला पहिला चित्रपट. चित्रपट अगदी सो सो होता; पण चित्रपटगृह, त्यातील वातावरण, गाण्यांच्या वेळी शिट्ट्यांची बरसात... हे सारे काही आनंददायी, आल्हाददायी होते. त्यानंतर असंख्य हिंदी/मराठी चित्रपट मोठ्या पडद्यावर पहिले. पुढे माझी ओळख रंगभूमीशी झाली. डॉ. श्रीराम लागू यांचे ‘नटसम्राट’ पाहिले आणि नाटक पाहण्याचे वेडच लागले. त्यानंतर दि गोवा हिंदू असोसिएशन, कलावैभव, अभिजात इत्यादि संस्थांची प्रत्येक कलाकृती मी पहिली. सांस्कृतिक, कला क्षेत्राचा मग विनाखंड भाग झालो. यातून मिळणाऱ्या आनंदाची पुंजी मी आयुष्यभर जपली. आणि तसे पाहिले तर आनंद आपण आपलाच निर्माण करायचा असतो. आयुष्यात चढउतार तर असतातच; पण त्यातून जे मिळेल त्यात समाधान मानण्याची हातोटी जर तुमच्यात असेल तर जीवन आनंद आपसूकच तुम्हाला वश होतो. मात्र, त्यासाठीचा मंत्र कायम जपायला हवा.गरिबीवर मात करीत प्रथम शिक्षण पूर्ण केले व नंतर स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन शासकीय नोकरी मिळविली. बहुतांशी काळ मंत्रालयात मानाचे स्थान असलेली पदे मिळाली. त्यात लोकसेवेची संधीही उपलब्ध झाली. राज्याच्या कानाकोपऱ्यातून, खेड्यापाड्यांतून येणाऱ्या जनतेला त्यांच्या कामी मदत केल्यानंतर त्यांना मिळणारा आनंद आणि त्यांच्या आनंदात सहभागी होऊन आपल्याला मिळणारा आनंद हा माझ्यासाठी जीवनातील आनंदाचा खरा अर्थ शोधणारा ठरला.कायमच मी स्वतःच्या अपेक्षा मर्यादित ठेवल्या आणि आपल्या आवडत्या गोष्टी जपल्या. नोकरीत असतानाही स्वतःच्या आवडीच्या गोष्टीत मी स्वतःला गुंतवून ठेवले. असंख्य मित्र मिळवले. इगो नावाच्या भस्म्याला मनातून हद्दपार केले. सामाजिक बांधिलकी, स्वतःचे छंद जिवापाड जपले. आवडत्या कलाकारांवर चित्रित व आवडत्या गायकांची गाणी, आहे त्या गळ्याने म्हटली. अगदी छोट्यामोठ्या समारंभात का होईना, जसे जमेल तसे अभिनययुक्त सादरीकरण केले. बऱ्यापैकी कविता केल्या. सामाजिक/प्रसार माध्यमांवर कायम सक्रिय राहिलो. कविता तसेच अभिनयाच्या व्हिडीओंच्या माध्यमातून लोकांना सामोरा गेलो. त्यामुळेच वेळ कसा घालवावा, या विवंचनेने मला कधीच भेडसावले नाही.आज मी पासष्टी ओलांडलेला व सुमारे चौदा वर्षांपूर्वी स्वेच्छानिवृत्ती घेतलेला ज्येष्ठ नागरिक आहे. पण रात्रीची शांत झोप व कोणत्याही विवंचनेविना येणारी सकाळची जाग ही माझी खरी संपत्ती आहे. हाच माझा खरा जीवन आनंद आहे.

# चारशेपार नाही, काठावर पास

लोकनेता न्यूज नेटवर्क

अठरावी लोकसभा निवडणूक ही खऱ्या अर्थाने देशाच्या राजकारणाला कलाटणी देणारी ठरली. जातीपातीचे राजकारण व राममंदिरासारख्या भावनिक मुद्द्यांना नाकारून देशातील सुज्ञ मतदारांनी आपल्या प्रल्गभतेचे दर्शन घडविले आहे. या निवडणुकीत मोदींची गॅरंटी म्हणत भाजपने 'चार सौ पार'चा नारा दिला असताना त्यांचा भ्रमाचा भोपळा मतदारांनी फोडला आहे. राममंदिर या एका मुद्द्यावर भाजपने ही निवडणूक लढवली असली, तरी उत्तर प्रदेशातील नागरिकांनी भाजपला सपशेल नाकारले आहे. अयोध्येतदेखील भाजपला आपली जागा राखता आली नाही. महाराष्ट्रात तर भाजपच्या ‘पक्ष फोडा व सत्तेत या’ या नीतीला मतदारांनी साफ नाकारत असली शिवसेना व असली राष्ट्रवादी काँग्रेस कोण, हे मतदानातून सिद्ध केले आहे. एखाद्या पक्षाचे अस्तित्व न्यायालय नाही, तर मतदार सिद्ध करतात हेही या निवडणुकीत स्पष्ट झाले आहे. मोदी नावाच्या वादळापुढे मागील दोन लोकसभा निवडणुकीत कोमात गेलेल्या काँग्रेसला या निवडणुकीत नवसंजीवनी मिळाली आहे. या निवडणुकीत भाजपविरोधात इंडिया आघाडीचा जन्म झाला व खरी लढत ‘एनडीए’ विरुद्ध ‘इंडिया आघाडी’ अशी झाली. देशात भांडवलदार नाही, तर सर्वांत मोठा मतदार बळीराजा आहे, हे दुर्लक्षून चालणार नाही. त्यांचे आंदोलन दहशतवादीविरोधी कारवायांप्रमाणे चिरडता येत नाही. हा विषय संवेदनशीलपणे हाताळावा लागतो, अशी नवी शिकवण भाजपला मिळाली असावी, अशी आशा करूया. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या आंदोलनातून १३ वर्षांपूर्वी जन्मलेल्या आम आदमी पक्षाला दिल्लीबरोबरच पंजाबमधील आपला गड राखता आला नाही. मुंबई ही दिल्लीत हुजरेगिरी करणाऱ्यांची नसून ती महाराष्ट्राची अस्मिता जपणाऱ्या अस्सल शिवसेनेचीच असल्याचे मतदारांनी दाखवून दिले आहे. पंतप्रधान मोदींनी शरद पवार यांची संभावना भटकती आत्मा, अशी केली होती. मात्र, खऱ्या राष्ट्रवादीच्या दहापैकी सात उमेदवारांना विजयी करत शरद पवार हे महाराष्ट्रातील राजकारणाचे आत्मा असल्याचे मतदारांनी सिद्ध केले आहे. भाजपच्या पक्ष फोडाफोडीच्या चाणक्यनीतीला मतदारांनी ईव्हीएमद्वारे उत्तर दिले आहे. भाजपचे फोडाफोडीचे राजकारण त्यांच्यासाठी धोक्याची घंटा ठरले. सन २०१९ च्या निवडणुकीत भाजपचे चाणक्य देवेंद्र फडणवीस यांनी ‘मी पुन्हा येणार’ अशी घोषणा दिली. महाराष्ट्रात १०५ जागा मिळवूनही फडणवीसांचे स्वप्न सत्यात उतरले नाही. त्यामुळे त्यांनी सत्तेसाठी शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पाडली. या दोन्ही प्रादेशिक पक्षांतील फूट महाराष्ट्रातील मतदारांच्या जिव्हारी लागली व त्याचे उत्तर मतदारांनी मतदानातून दिले. भाजपला महाराष्ट्रात महायुतीचा पराभव दिसत होता. त्यामुळेच त्यांनी पंतप्रधान मोदी यांच्या विक्रमी सभा घेतल्या, पण मोदींचा करिश्माही चालला नाही. दोन्ही बाजूंकडून विकासाच्या मुद्द्याऐवजी या निवडणुकीत वैयक्तिक पातळीवर हीन टीका केली गेली. शेतकरी व कष्टकरी या निवडणुकीत पूर्णपणे हद्दपार झाला होता. एका सभेत राममंदिराचे गुणगान गायचे, तर दुसऱ्या सभेत जातीयवादावर बोलायचे, हे पंतप्रधान मोदी यांचे दुटप्पी धोरण मतदारांच्या पचनी पडले नाही. ईडी, सीबीआय व आचारसंहिता काळात निवडणूक आयोगाचा आपल्या फायद्यासाठी भाजपने केलेला अयोग्य वापर मतदारांच्या नजरेतून सुटला नाही. शिवसेनेचे विभाजन व त्यानंतर पक्षच चोरीला गेल्याने काही काळ शांत बसलेले उद्धव ठाकरे यांना योग्य वेळी शरद पवार यांची साथ लाभली. त्यामुळे उद्धव ठाकरे यांचा ठाकरी बाणा पुन्हा दिसू लागला. निवडणुकीत अखेरपर्यंत त्यांनी आपली आक्रमकता कायम ठेवत मोदींना सडेतोड उत्तरे दिली. शिवसेनेप्रमाणेच राष्ट्रवादी काँग्रेसची गत झाली. भाजपने काकापासून पुतण्याला वेगळे करत सत्तेत सामावून घेतले, तरीही भाजपची भूक भागत नसल्याने त्यांनी मनसेला गळाला लावण्याचा प्रयत्न केला. मनसेने अपेक्षित मागण्या पूर्ण होत नसल्याचे पाहून या सरकारला पाठिंबा जाहीर केला. एकेकाळी महाराष्ट्रात युतीच्या नावाने संसार थाटणाऱ्या भाजपने शिवसेना पक्ष चिन्हासह चोरला. त्यांचे आमदार, खासदार चोरले. सरतेशेवटी राज ठाकरे यांच्या रूपाने त्यांचा भाऊदेखील चोरला. एकंदरीत शिवसेनेला सर्व पातळ्यांवर एकटे पाडण्याची एकही संधी भाजपने सोडली नाही. त्यामुळे मतदारांनी भाजपला आता महाराष्ट्रात एकटे पाडले आहे. भाजपपेक्षा शिवसेनेचे सर्वाधिक खासदार या निवडणुकीत निवडून आले आहेत. नाशिक लोकसभा मतदारसंघात शिवसेना ठाकरे गटाने सिन्नरमधून राजाभाऊ वाजे यांना उमेदवारी देऊन सर्वाधिक मतांनी निवडूनही आणले. येथे शेवटपर्यंत महायुतीकडून उमेदवारी जाहीर करण्यात टाळाटाळ करण्यात आली. येथे उमेदवार उभा करण्यापेक्षा उमेदवारी जाहीर होऊ नये यासाठी राजकारण खेळले गेले. ऐनवेळी येथून हेमंत गोडसे यांना उमेदवारी दिली गेली. मात्र, त्यांच्या प्रचारासाठी महायुतीतील सहकारी पक्षांनी कंबर कसली नाही. उमेदवारी न मिळाल्याने सुरुवातीपासून नाराज असलेले छगन भुजबळ यांची नाराजी शेवटपर्यंत कायम होती. भाजपचे संकटमोचक गिरीश महाजन यांनी ऐनवेळी येथील मोर्चा सांभाळत आर्थिक गणिते मांडत गोडसे यांनी विजयी करण्याचे उसने आवसान आणले. पैशाच्या जोरावरही येथील मतदारांची मने त्यांना जिंकता आली नाहीत. दिंडोरीत केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांना पराभूत करण्यासाठीच भाजपने त्यांना उमेदवारी दिली का? अशी शंका उपस्थित होत आहे. राज्यात भाजपचे पाच केंद्रीय मंत्री पराभूत झाले आहेत. डॉ. पवार यांच्या विरोधात नाराजीचे वातावरण भाजपने निवडणूकपूर्व केलेल्या सर्वेक्षणातून त्यांना दिसले नाही का? येथे भास्कर भगरे यांना उमेदवारी देऊन शरद पवार यांनी योग्य वेळी भाकरी फिरवली. दिंडोरी कांदा पिकाचे विक्रमी उत्पादन घेणारा मतदारसंघ असताना भाजपने कांदा निर्यातबंदी प्रश्नावरून धरसोडीचे धोरण अवलंबले. मोदींनी कांद्याचे आगार पिंपळगाव बसवंत येथे सभा घेऊन कांदाप्रश्नावर बोलणे टाळले. 'मोदीजी कांदाप्रश्नावर बोला' असे सांगत शेतकऱ्याने या सभेत गोंधळ घातला. नांदगावचे आमदार सुहास कांदे यांची नाराजी दूर करण्यात डॉ. पवार यशस्वी झाल्या असल्या, तरी कांदा निर्यातबंदी प्रश्नावरून त्यांना उत्पादकांची नाराजी दूर करता आली नाही. डॉ. पवार यांच्या पराभवास बळीराजाची नाराजी हे एकमेव कारण ठरले. भगरे यांना या ठिकाणी लागलेली लॉटरीच समजावी लागेल. धुळे मतदारसंघातही शेवटच्या अटीतटीच्या क्षणी डॉ. शोभा बच्छाव यांचा विजय झाला आहे. येथील खासदार डॉ. सुभाष भामरे यांनाही कांदाप्रश्नावरून पराभूत व्हावे लागले. नाशिकच्या राजकारणातून शेजारील धुळे जिल्ह्यात उडी घेणाऱ्या डॉ. शोभा बच्छाव यांनी काँग्रेसने दिलेली उमेदवारी सार्थ ठरवत या मतदारसंघाची 'शोभा' वाढवली आहे. डॉ. भामरे यांच्याविरोधात कसमादे पट्ट्यात असलेल्या नाराजीच्या वातावरणाचा त्यांच्या विजयात मोठा वाटा म्हणावा लागेल. लोकसभा निवडणूक- २०२४ मध्ये भाजपने ३७० जागांचे लक्ष्य ठेवत 'एनडीए' आघाडीला चारशेच्या पुढे जागा मिळतील, असा दावा केला होता. हे लक्ष्य गाठण्यासाठी भाजपने देशभरात ४४१ उमेदवार उभे केले होते. त्यांपैकी त्यांना फक्त २४२ जागा मिळाल्या आहेत. २०१४ मध्ये जेव्हा डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा मोदींनी प्रथमच पराभव केला होता, तेव्हा भाजपने स्वबळावर २८२ जागा जिंकल्या होत्या. त्यानंतर २०१९ मध्ये भाजपने ३०३ जागा जिंकत नवा विक्रम केला होता. २०२४ मध्ये भाजप विजयाची हॅटट्रिक गाठणार, अशी गॅरंटी होती. मात्र, भाजपची गॅरंटी काय, वॉरंटीसुद्धा घेणे मतदारांनी टाळले आहे. त्यामुळे भाजपला ३७० जागा सोडा, साधे बहुमतही मिळालेले नाही. या सुमार कामगिरीमुळे भाजपची मातृसंस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नरेंद्र मोदी नाही, तर नितीन गडकरी यांना पंतप्रधानपदी बसवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे.

**प्रशांत बाफना**
८०५५४४०३८५

# खारफुटी वाचविण्यासाठी...

लोकनेता न्यूज नेटवर्क



खारफुटीसमोर असलेल्या धोक्यांमध्ये हवामान बदल हा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. जगातील ३३ टक्के म्हणजेच एक तृतीयांश खारफुटी परिसंस्थांना हवामान बदलामुळे धोका असल्याचे या अभ्यासात अधोरेखित करण्यात आले आहे.किनारी भागाच्या रक्षणासाठी खारफुटी हा महत्त्वाचा घटक आहे. मात्र अलीकडच्या काही वर्षांत खारफुटी क्षेत्रावर विविध कारणांमुळे घाला आला आहे. जगभरातील निम्म्याहून अधिक खारफुटी परिसंस्था नष्ट होण्याचा धोका असून पाचपैकी एका खारफुटीसमोर तर अस्तित्वाचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे, असे गंभीर निष्कर्ष इंटरनॅशनल युनियन फॉर कन्झर्वेशन ऑफ नेचरच्या (आययूसीएन) रेड लिस्ट ऑफ इकोसिस्टिमच्या निकषांनुसार केलेल्या अभ्यासात मांडण्यात आले आहेत.खारफुटीसमोर असलेल्या धोक्यांमध्ये हवामान बदल हा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. जगातील ३३ टक्के म्हणजेच एक तृतीयांश खारफुटी परिसंस्थांना हवामान बदलामुळे धोका असल्याचे या अभ्यासात अधोरेखित करण्यात आले आहे. जंगलतोड, विकास, प्रदूषण आणि धरणांची बांधकामे या कारणांमुळे खारफुटीसमोर धोका निर्माण झाला आहे. मात्र, हवामान बदलाच्या परिणामी सागराच्या पातळीत वाढ आणि शक्तिशाली चक्रीवादळांची वाढती वारंवारता यामुळे खारफुटीला असलेला धोका वाढत आहे. यासाठी जगभरातील खारफुटी क्षेत्राटे ३६ विभागांमध्ये वर्गीकरण करून अभ्यास करण्यात आला. या अभ्यासांती, पुढील ५० वर्षांत जगभरातील एक तृतीयांश खारफुटी विभागांची हानी होईल, तर २५ टक्के क्षेत्र बुडिताखाली येईल, असा अंदाज यात वर्तवण्यात आला आहे. यात हिंदी महासागराच्या उत्तरेकडील खारफुटीसह वायव्य अटलांटिक, तांबडा समुद्र, दक्षिण चीन समुद्र आणि एडनचे आखात यांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.जगभरातील खारफुटीमध्ये ११ अब्ज टन कार्बन साठा आहे. तेवढ्याच क्षेत्रावरील विषुववृत्तीय वनांच्या तुलनेत हे प्रमाण जवळजवळ तिप्पट आहे. हवामान बदल आणि सागर पातळीतील वाढीमुळे सन २०५०पर्यंत खारफुटीमध्ये साठवलेला १.८ अब्ज टन, म्हणजेच १६ टक्के कार्बन उत्सर्जित होऊ शकतो, असा अंदाज या अभ्यासाने वर्तवला आहे. आययूसीएनच्या नेतृत्वाखाली झालेल्या या अभ्यासात ४४ देशांमधील २५० तज्ज्ञांनी भाग घेतला. खारफुटींचे क्षेत्र हे लाखो संवेदनशील समुदायांचा अधिवास आहे. किनारी आपत्तींचा धोका कमी करणे, कार्बन साठा आणि मच्छिमारीला साह्य यादृष्टीने खरफुटीचे मोल मोठे आहे. त्यामुळे खारफुटींचा ऱ्हास हा निसर्ग आणि लोकसंख्या दोन्हींसाठी हानिकारक ठरू शकतो. याआधीच गमावलेली खारफुटी पुनरुज्जीवित करण्याच्या तसेच बचावलेल्या क्षेत्राचे संवर्धन करण्याच्या प्रयत्नांना या अहवालाने दिशा मिळू शकेल, असे मत आययूसीएनच्या महासंचालक ग्रेथेल अग्विलर यांनी व्यक्त केले.

# निकालानंतरची अग्निपरीक्षा

लोकनेता न्यूज नेटवर्क



राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत यंदा १४ लाख ८४ हजार ४४१ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. पहिल्यांदाच मे महिन्यात दहावीचा निकाल लावण्यात राज्य मंडळाला यश आले. यंदा उत्तीर्णांचा टक्का वाढण्यासोबतच नव्वद टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही ८१ हजार ९९१ इतकी प्रचंड आहे. त्यामुळे अकरावी प्रवेशाचे मेरिट वाढणार, नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेश चुरशीचे होणार, हे उघड आहे.वाढत्या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांवरील ताणानेही परिसीमा गाठली आहे. ९० टक्के गुण म्हणजे विज्ञान शाखेलाच गेले पाहिजे, नामांकित महाविद्यालयात प्रवेश मिळाला तरच भविष्य उज्ज्वल आहे, या चक्रव्यूहातून पालकांनी आधी बाहेर पडले पाहिजे. दहावीचे गुण हा केवळ करिअरमधील एक टप्पा असून यापुढे सामाईक परीक्षांचे अनेक टप्पे आहेत. उज्ज्वल भविष्याची दारे उघडण्यासाठीच्या संधी तिथे आहेत, ही मानसिकता पालकांसह शाळांनीही स्वीकारणे आवश्यक आहे. कमी गुणांची व्याख्याही आता बदलली आहे. विद्यार्थ्यांचे ८० टक्के गुणही कमी वाटू लागले आहेत. गुणांच्या पलीकडे जाऊन विविध संधींविषयी विद्यार्थ्यांना अवगत करणे, त्यांचा कल हेरून योग्य मार्गदर्शन करणे यासाठी ठोस धोरण ठरवणे गरजेचे आहे. राज्य मंडळातील विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने शिक्षण विभागाने अभ्यासक्रम बदलण्यापेक्षा ‘सीबीएसई’, ‘आयसीएसई’ आणि राज्य मंडळाच्या मूल्यांकन पद्धतींत एकसूत्रता येईल, याकडे लक्ष देण्याची गरज आहे. दहावीनंतर ‘इंटिग्रेटेड’चे फुटलेले पेव कमी करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांमध्येही ‘सीईटी’, ‘नीट’सारख्या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना सक्षम करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलणे आवश्यक आहे.अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रकिया ही विद्यार्थ्यांच्या हिताचीच आहे, पण सप्टेंबर, ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या प्रवेशांवर मर्यादा येणे आवश्यक आहे. जसे राज्य मंडळाने मे महिन्यात दहावीचा निकाल लावणे यंदा शक्य करून दाखवले, तसेच जुलै मध्यावर अकरावी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याचे लक्ष्य शिक्षण विभागाने ठेवावे. पुढील शैक्षणिक वर्षापासून अकरावी, बारावीच्या शिक्षण पद्धतीमध्ये अनेक बदल अपेक्षित आहेत, ते करताना विद्यार्थ्यांवरील ताण कमी होईल आणि ते भविष्यातील आव्हाने पेलण्यास सक्षम होतील, याचा विचार व्हायला हवा.

# पर्यावरणाचा संदेश देण्यासाठी सायकलवरुन वाशिम ते रायगड प्रवास ;रायगडावर केले वृक्षारोपण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाशिम । प्रतिनिधी**

पर्यावरणाची वारी, सायकल सवारी' ही टॅगलाईन घेऊन वाशिम जिल्हा परिषद सायकल ग्रुपच्या ८ सदस्यांनी वाशिम ते रायगड हा ६५० किलोमिटरचा प्रवास सायकलने पूर्ण केला. एवढेच नाही तर गडावर जाऊन संभाजीराजे छत्रपती महाराज यांची भेट घेऊन त्यांना झाड भेट दिले आणि रायगडावरील वनाधिकारी श्री भामरे यांच्या समक्ष रायगडावर झाडाचे रोपण करण्यात आले. वाशिम येथुन दि. ३१ मे रोजी निघालेल्या या पर्यावरण सायकल दिंडीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी हिरवी झेंडी दाखवून शुभेच्छा दिल्या होत्या.छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश देण्यासाठी वाशिम येथील सायकलिंग ग्रुप च्या वतीने दिनांक ३१ मे ते ६ जून पर्यंत या पर्यावरण दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे दररोज केवळ ४० किलोमीटर पर्यंत सायकल चालवणारे हे सायकल रायडर्स पहिल्यांदाच पुणे ते रायगड हा ६५० किलोमीटरचा प्रवास ५ दिवसात पूर्ण केला. जिल्हा परिषद वाशिमच्या सायकल ग्रुपची ही पहिली आणि एवढ्या दीर्घ पल्ल्याची पर्यावरणपूरक सायकल दिंडी आपल्या मार्गातील चढ- उतार आणि अडथळ्यावर मात करीत ५ जूनच्या पूर्वसंध्येला रायगडावर पोहोचली. वाशिम जि. प. चे सीईओ वैभव वाघमारे यांनी पाठवलेले झाड रायगडावर लावुन संपूर्ण राज्याला वृक्षारोपन वृक्ष संवर्धनाचा संदेश देणार्या या सायकलवीरांचा हा थक्क करणारा सायकल प्रवास आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. मागील काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल करून सिमेंटची जंगले उभी राहिली आहेत. याचा अपेक्षित परिणाम म्हणून काही राज्यांमधील तापमान ५० ते ५३ डिग्री सेल्सियस पर्यंत गेले आहे. तसेच पर्यावरणाचे संतुलन ही बिघडले आहे. लोकांना या बाबीचे गांभीर्य



लक्षात आणून देण्यासाठी या सायकल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. रायगडावर वृक्षारोपण करून या दिंडीचा समारोप करण्यात आलावाशिम ते रायगड या प्रवासादरम्यान आणि मुक्कामाच्या ठिकाणी भेटलेल्या लोकांना या सायकल स्वारांमार्फत पर्यावरणाचे महत्त्व सांगून, त्यांना झाड भेट देऊन ते लावण्याबाबत व जगवण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. या सायकल दिंडीचा पहिला टप्पा वाशिम ते सिंदखेडराजा हा १३५ किलोमीटर, सिंदखेड राजा ते देवगड १५५ किलोमीटर, देवगड ते अहमदनगर मार्गे रांजणगाव १४० किलोमीटर, रांजनगाव, भीमा कोरेगाव, वढु बु., तुळापुर आळंदीमार्गे मुळशी १३३ आणि मुळशि ते रायगड ८७ कि. मी. असा ६५० किलो मिटरचा प्रवास पूर्ण करत सायकल वर निघालेली ही पर्यावरणाची दिंडी रायगडावर पोहोचली. पर्यावरणाचा संदेश देणाऱ्या या सायकल दिंडीमध्ये जिल्हा परिषदेचे सुखदेव जाधव, राम श्रृंगारे, भारत राजस, रामानंद ढंगारे, सतीश लहामगे, निलेश देवकते मिथुन वाळले, शिवकुमार सुर्वे यांनी सहभाग घेतला आहे.या सायकल दिंडीच्या प्रवासादरम्यान सिंदखेड राजा पंचायत समितीचे सचिन मिसाळ व सर्व पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी यांनी सायकल स्वारांचे स्वागत करून प्रोत्साहन दिले. अहमदनगर येथील पुरुषोत्तम जाधव आणि अहिल्याबाईनगर सायकल ग्रुप आणि रोटरी क्लब चे सदस्य यांनीही वाशिम च्या या सायकल स्वारांचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले. वाशिम जिल्हा परिषद चे लेखाधिकारी माणिक नागरे, रायगड येथील संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष वैभव सुर्वे आणि वाशिम येथील संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सुभाष बोरकर यांनी सायकल दिंडी दरम्यान सहकार्य केले.


# रांजणगाव (शे.पु) येथे पंचायत समिती मार्फत विविध योजनेचे लाभार्थ्यांना वाटप

## पं.स सदस्य दिपक बढे यांचा पाठपुरावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गंगापूर । प्रतिनिधी**

रांजणगाव शेणपुजी ता गंगापूर येथे दिनांक ०७/०६/२०२४ रोजी ग्रामपंचायत कार्यालयात पंचायत समिती गंगापूर मार्फत विविध योजनेचे लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले यामध्ये झेरॉक्स मशीन ०९ नग, शिलाई मशीन ११ नग,सायकल ०२ नग, कम्प्युटर ०१नग, वाटप करण्यात आले असून एकुण २३ लाभार्थ्यांना ५,३९,५३० रुपये लाभ पंचायत समिती मार्फत शेष फंडातून मागासवर्गीय यांना देण्यात आला योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी पंचायत समिती सदस्य दिपक बढे यांनी पाठपुरावा केला या योजनेचे वाटप रांजणगाव ग्रामपंचायत कार्यालयात करण्यात आले मनीषा कानडे,



सीमा नरवडे, प्रतिक्षा घुसळे,बायडाबाई तैर, सुभाष दाभाडे,सिमा जाधव,भारती कांबळे, आम्रपाली गोवंदे,कासाबाई भिसे यांच्या सह अदि लाभार्थ्यांचा समावेश आहे.आमदार प्रशांतजी बंब यांनी या लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी मदत केली मिळालेल्या साहित्यांच्या माध्यमातून लाभार्थ्यांना स्व रोजगारा सह आर्थिक हातभार लागणार असल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. यावेळी पंचायत समिती सदस्य दिपक बढे, ग्रामविकास अधिकारी गणेश धनवाई,माजी सरपंच मोहनीराज धनवटे, सामाजिक कार्यकर्ते शरद किर्तीकर, शिवाजी दामोधर, लक्ष्मण वैष्णव,अमर तराटे, भिमराव किर्तीकर, सुलोचना गोडबोले, यांच्या सह आदिंची यावेळी उपस्थितीती होती.

# महाराष्ट्र ग्रामीण बँक प्रायोजित महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सातोना । प्रतिनिधी**

सातोना खुर्द येथे येणाऱ्या ८ तारखेला वार शनिवार रोजी सकाळी १०:३० वाजता .सर्व शेतकरी वर्गाला पीक कर्ज नूतनीकरण व्याज परतावा तसेच शासनाच्या प्रोत्साहन पर योजनेची महत्त्व पटवून सांगण्यासाठी व त्यांच्या सोबत संवाद साधण्यासाठी सर्व शेतकरी वर्गाला पीक कर्ज नूतनीकरण व्याज परतावा तसेच शासनाच्या प्रोत्साहन पर योजनेचे महत्त्व पटवून सांगण्यासाठी व त्याच्यासोबत संवाद साधण्यासाठी महा ग्रामीण नवचेतन संवाद यात्रेचे दिनांक ५ जून ते १५ जून दरम्यानआयोजन करण्यात येत आहे.संपूर्ण मराठवाड्यात तब्बल ५० ठिकाणी कार्यक्रम घेण्यात येणार असून यादरम्यान तब्बल २००० नियमित पीक कर्ज धारकांचा सत्कार तसेच




या संपूर्ण दरम्यान झाडांची वृक्षारोपण देखील बँकेमार्फत करण्यात येणार आहे.सदर यात्रा ही पाच जून रोजी छत्रपती संभाजीनगर येथून सुरू होऊन दोन वेगवेगळ्या मार्गाने नांदेड याा ठिकाणी एकत्र येणार असून पंधरा तारखेला नांदेडला समारोपाचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे.एक टीम छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली व नांदेड व दुसरी टीम छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, लातूर ते नांदेड या मार्गाने मार्गक्रमण करणार असून त्या दरम्यान –ढच् मशीनचे प्रात्यक्षिक तसेच आर्थिक समावेशन डिजिटल साक्षरता आणि सामाजिक सुरक्षा योजना बद्दल जनजागृती करण्याचे काम देखील बँक मार्फत करण्यात येईल, बँकेचे सर्व सन्माननीय ग्राहक गावातील प्रतिष्टीत नागरिक, बचत गटातील महिला वर्ग तसेच संबंधित शासकीय यंत्रणेतीलअधिकारी व कर्मचारी या सर्वांनी दिनांक ८/६/ २०२४ रोज शनिवार सकाळी १० वाजून ३० मिनिटाला सातोना खुर्द येथे येणाऱ्या महा ग्रामीण नवचेतना संवाद यात्रेत मोठ्या संख्येने सामील होण्याची व ह्या सगळ्या गोष्टींचा लाभ घेण्याचे आवाहन शाखाव्यवस्थापक श्री भूषण चौधरी यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

# मनोहरराव नाईक कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे निट परीक्षेमध्ये घवघवीत यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**महागांव । प्रतिनिधी**

भारत सरकारने घेतलेल्या वैद्यकिय अभ्यासक्रम प्रवेश पूर्व चाचणी परीक्षा (छएएढ) चा निकाल नुकताच घोषित झाला आहे. त्या परीक्षेत स्व.संजय शिक्षण संस्था गुंज व्दारा संचालित मुख्यमंत्री माझी शाळा सुन्दर शाळा पुस्कार प्राप्त मनोहरराव नाईक माध्य व उच्च माध्य विद्यालय गुंज येथील विद्यार्थ्यांना घवघवीत यश मिळाले आहे. श्रेयश संदिप जिल्हेवार यास ७२० पैकी ६४९ गुण प्राप्त झाले आहे. सारंगधर गजानन भोपी यास ७२० पैकी ६०१ गुण व कु.धारा विनोद पवार



७२० पैकी ५६२ गुण मिळवुन वैद्यकिय अभ्यासक्रम प्रवेशास पात्र ठरले आहे. या सदर विद्यार्थ्यांनी एच.एस.सी परीक्षेत सुध्दा उत्कृष्ट गुण संपादित केलेल आहे. अतिशय कठिण परीक्षेमध्ये उच्चांक गाठून संस्थेचे नाव वैद्याकिय क्षेतात्र नोंदविण्याचे काम केले आहे. या विद्यार्थ्यांना मिळालेल्या यशामुळे संस्थेचे व शाळेचे नांव सर्वत्र गौरविल्या जात असुन संस्थेतील इतर विद्यार्थांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.विविध क्षेत्रात आमच्या संस्थेतील विद्यार्थी उंच भरारी घेवून उच्च शिक्षित, सुसंस्कारित, शिस्तप्रीय कर्तव्यदक्ष व उद्योगशिल बनत असल्याच समाधान व्यक्त करुन गुणवंत विद्यार्थ्यांचे मा.संस्थापक प्रा. शिवाजीराव राठोड यांनी विद्यार्थ्याचे सत्कार करुन कौतुक व अभिनंदन केले. व भविष्यासाठी सुयश चिंतले तसेच विद्यालयाचे प्राचार्य. अरविंद यांची जाधव. व आमचे मार्गदर्शक अँड. महेश शिवाजी राठोड यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या तसेच विशेष गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यास सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले विद्यार्थी त्यांना मिळालेले यशस्वी आई वडील व गुरुजनांना देतात.

# हिवरा ग्रामपंचायत मध्ये साजरा करण्यात आला शिवस्वराज्य दिन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**महागांव । प्रतिनिधी**

दिनांक ०६ जुन २०२४ रोजी सकाळी ठिक ०९:०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय हिवरा (सं.) येथे शिवस्वराज दिनानिमित्त शिव राजदंड स्वराज्य गुढी उभारून पूजन करण्यात आले. यावेळी हिवरा (सं.) ग्रामपंचायत च्या सरपंच सौ.मेघा शिरीष बोरूळकर , उपसरपंच शरद कदम पाटील , ग्रामपंचायत सदस्य राजुभाऊ धोतरकर , अशोक कदम पाटील , रमेश भुसारे , पोलीस पाटील प्रवीण कदम , गावातील प्रतिष्ठित नागरिक ,बाबाराव कदम , गजानन आंडगे ,संदीप खोंडे , शिरीष बोरूळकर , अनिलजी कदम , लक्ष्मण कदम , रवी प्रकाश कदम , बबनराव लोमटे तसेच ग्रामपंचायत कर्मचारी सुधीर कदम , स्वप्निल बेलखेडे , अशोक भुसारे , आशिष कदम , समाधान मोरे गावातिल नागरिक उपस्थित होते.

# मराठा सेवा संघ महागाव तर्फे शिवराज्याभिषेक दिनी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा थाटात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**महागांव । प्रतिनिधी**

मराठा सेवा संघ महागाव तालुक्याच्या वतीने ६ जून शिवराज्याभिषेक दिना निमित्त नीट परीक्षेतील तसेच इयत्ता बारावी व दहावीतील गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन मातोश्री विद्यालय महागाव येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ . सुनंदा दिलीपराव कोपरकर नगराध्यक्षा नगरपंचायत महागावप्रमुख मार्गदर्शक यशवंत देशमुख सर (राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक ),प्रमुख पाहुणे पत्रकार गजानन वाघमारे, संजय कोपरकर, पवन रावते, गणेश , राजू राठोड शिवसेना तालुका प्रमुख, सुरेशराव देशमुख,दिलीपराव कोपरकर, नानासाहेब देशमुख ,रमेश पवार, तेजस नरवाडे शिवसेना शहरप्रमुख,अमोल राजवाडे ,उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता राष्ट्रमाता स्वराज्य संकल्पिका जिजाऊ माता व स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज तसेच शिवराज्याभिषेक दिनाच्या प्रतिमेचे पूजन व जिजाऊ वंदनेने करण्यात आली. मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. मान्यवरांच्या शुभहस्ते नीट परीक्षेत यश संपादन करणारे विद्यार्थी कु .कृतिका संजय गादेवार (६४६), कु. सृष्टी नानासाहेब देशमुख (६४५), जगन प्रल्हादराव कदम (५८१), इयत्ता बारावीचे तालुक्यातून प्रथम चिराग संदीप वट्टमवार (९२.१७), द्वितीय कु .कृतिका संजय गादेवार (९०.८३), इयत्ता दहावीचे तालुक्यातून प्रथम कु .प्रशांती गजानन नरवाडे (९७.२०), द्वितीय कु .श्रावणी किसन फटिंग (९६.२०) तसेच महागाव तालुक्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रथम व द्वितीय ४५ विद्यार्थ्यांचा मराठा सेवा संघाची शिवधर्म दिनदर्शिका, गौरवपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला व पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. गजानन वाघमारे व यशवंत देशमुख सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संदीप शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन अमोल जगताप यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष उदयभाऊ नरवाडे, सचिव पंकज देशमुख,जिल्हा सचिव डॉ. संदीप शिंदे, जिल्हा कार्यकारणी सदस्य अमोल जगताप, उपाध्यक्ष विठ्ठल वाघमारे, किशोर सोळंके, प्रतिष अडकिने, स्वप्निल नरवाडे, मंगेश वानखेडे, सोनू नरवाडे, विजय कदम, रवी भांगे यांनी प्रयत्न केले. या गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यासाठी महागाव तालुक्यातील सर्व गुणवंत विद्यार्थी त्यांचे आई-वडील, शिक्षक व मराठा सेवा संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



# आज हरदडा येथे होणार पहिली धम्म परिषद प्रणितातार्इ कांबळे बहुउद्देशीय संस्थे तर्फे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम रजा**

उमरखेड तालुक्यातील हरदडा येथे प्रणितातार्इ कांबळे बहुउद्देशीय संस्थेद्वारा पहिल्या धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले असून दिनांक ९ जून रोजी होणाऱ्या या धम्म परिषदेला भंते आनंदबोधी महाथेरो, भंते पट्टीशत करंजी, हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे नवनियुक्त खासदार नागेश पाटील आष्टीकर, सामाजिक कार्यकर्ते साहेबराव कांबळे, मोहनराव मोरे, यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाला लाभणार असून या कार्यक्रमाचे उद्घाटन गौतम कांबळे यांच्या हस्ते होणार आहे. धम्म परिषदेचे स्वागताध्यक्ष म्हणून अमोल कदम हे असणार आहेत.चिमाजी बापू काळबांडे हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राहणार असून प्रमुख वक्ते म्हणून प्रख्यात विचारवंत डॉ. प्रा.भास्कर दवणे नांदेड यांचे प्रखड व आंबेडकर चळवळीशी निगडित विचार ऐकायला मिळणार आहेत पाच सत्रात होणाऱ्या या धम्म परिषदेच्या पहिल्या सत्रात सकाळी ८ वाजता सुजातातार्इ दवणे यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम होणार आहे.

त्यानंतर दुसऱ्या सत्रात सकाळी नऊ वाजता भिकू संघाची धम्मदेशना पार पडणार आहे.

तिसऱ्या सत्रात सायंकाळी सात वाजता प्रख्यात विचारवंतांच्या व्यख्यानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून चौथ्या सत्रात रात्री ८ वाजता आंबेडकर चळवळीतील व विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव सोहळा पार पडणार असून त्यानंतर




रात्री नऊ वाजता सांस्कृतिक संध्या हा भीम गीतांचा कार्यक्रम पार पडणार असून यामध्ये प्रसिद्ध गायक दिनकर लोणकर हिंगोली आणि गायिका आशा चौरे बुलढाणा यांच्या वैचारिक भीम गीतांची जुगलबंदी ऐकायला मिळणार आहे या धम्म परिषदेसाठी विशेष उपस्थिती म्हणून डी. एफ. हरदडकर, माजी आमदार विजयराव खडसे, महेंद्र मानकर, अरुणदादा आळणे, डॉ. श्याम दवणे, डॉ. अंकुश देवसरकर, नामदेवराव ससाने, आमदार उमरखेड विधानसभा नितीन भाऊ भुतडा, प्रकाश पाटील देवसरकर, सुभाष सावते, किशोर भवरे, सुदर्शन रावते, प्रा. अनिल काळबांडे, प्रेम हनवते चंद्रमणी सावतकर, मिलिंद धुळे, पत्रकार सिध्दार्थ दिवेकर (शहराध्यक्ष भीटासे), गुणवंत राऊत, गौतम दवणे, प्रफुल दिवेकर (सामाजिक कार्यकर्ते) तसेच धम्म चळवळीशी निगडित मान्यवरांच्या सत्कार सोहळ्याचे सन्मानपत्र देऊन करण्यात येणार आहे.या धम्म परिषदेला मोठ्या संख्येने मान्यवर मंडळी उपस्थित राहणार असून हरदडा येथील आयोजित पहिल्या धम्म परिषदेला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या प्रणितातार्इ कांबळे यांनी केले आहे.

## मापेगांव बू येथील अंगणवाडी मध्ये गरोदर मातांना मार्गदर्शन शिबिर



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**परतूर । प्रतिनिधी**

तालुक्यांतील मापेगांव बू येथील अंगणवाडी मध्ये महिला बचत गट यांच्या माध्यमातून गावातील गरोदर मातांना तसेच स्तांनदा मातेला लहान बाळाची कशा प्रकारचे काळजी घ्यावी,तसेच गरोदर मातांनी कोणकोणत्या प्रकारच्या जेवणामध्ये आहार घेतला पाहिजे, आपली व आपल्या बाळाची काळजी घेताना कोण कोणत्या गोष्टीची पालन करावे असे अनेक महत्वच्या मुद्यावर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आहेत. यावेळी मार्गदर्शन करताना अंगणवाडी सेविका शशिकला आश्रोबा नाईक,महिला सेल्फ मॅनेजर श्रीमती सागर दुगाने , सी. आर. पी, शिवकन्या भुसारे, नंदा गिरी, शेख. परवीन शेख मुन्वर, सत्यशिला हिंगे, द्वारका शेंडगे, सरस्वती देशमाने, निकिता साकळकर , सोमित्रा दायमा, शिलातार्इ गिरी आदी महिला उपस्थित होत्या.

## 'कसबा' आता कायमचा झाला आमचा
# मध्यंतरी अपघातामुळे एक वेगळा आमदार झाला-मुरलीधर मोहोळ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**

कसबा विधानसभा पोटनिवडणूक मध्ये एक अपघात झाला होता आणि वेगळा आमदार निवडून आला होता. त्यांनी वेगळी इमेज निर्माण करत कसबा बाबत त्यांनी दिशाभूल केली. मात्र , या निवडणुकीत खरी त्यांची इमेज समोर आली असून पुणेकर यांनी त्यांना नाकारले आहे. कसबा मध्ये आम्हाला मतदारांनी पसंती दिली असून यापुढील काळात आम्ही कसबा कायम आमच्याकडे ठेऊ असा टोला खासदार मुरलीधर मोहोळ यांनी आमदार रवींद्र धंगेकर यांना पत्रकारांशी बोलताना लगावला आहे.

पुण्यातील ग्रामदैवत कसबा गणपती मंदिर येथे गणपतीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांची संवाद साधला यावेळी पुणे पालन व मित्रपरिवार बद्दल माहिती त्यांच्या स्वागताच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्वर्गीय खासदार गिरीश बापट यांच्या कार्यालयात जाऊन त्यांनी प्रतिमेचे पूजन केले. यावेळी शहराध्यक्ष धीरज घाटे, पुनीत बालन, अभिनेते प्रवीण तरडे, उपस्थित होते.मोहोळ म्हणाले, एखादे चांगले काम करताना देवाचे आशीर्वाद महत्वाचे असतात त्याप्रमाणे मी ग्राम दैवत येथे आलो आहे. नवीन जबाबदारी घेऊन प्रामाणिक काम यापुढे करेल. स्थानिक आणि केंद्र राज्याचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम करण्यात येईल. पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ काम मार्गी लावण्यासाठी काम करण्यात येईल. पुण्यातील पावसाळे पूर्वी कामे मार्गी लागावी यासाठी मनपा आयुक्त यांची भेट घेतली आहे . कमी वेळेत जास्त पाऊस पडत आहे त्यामुळे याबाबत खबरदारी घेतली पाहिजे.निवडून आल्यानंतर महायुती नेत्यांचे अभिनंदन फोन येत आहे.



# बियाणांची साठेबाजी करून कृत्रिम टंचार्इ-राजेंद्र आमटे

## शेतकऱ्यांना जास्तीच्या भावाने विक्री थांबवा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

पाऊस पडल्यामुळे शेतकरी बियाणे खरेदी करण्यासाठी बाजारात फिरत आहे अनेक व्यापारी बाजार पेठेत बियाणे उपलब्ध असताना शेतकऱ्यांना बियाणे संपले म्हणून वापस पाठवतात अनेक व्यापारी बियाणांची साठेबाजी करून बाजारात कृत्रिम टंचार्इ निर्माण करत आहेत नंतर तेच बियाणे जास्तीच्या भावाने विक्री केली जाते साठेबाजी करून कृत्रिम टंचार्इ निर्माण करणाऱ्या व्यापाऱ्याची गोडवणे तपासा अन्यथा शिवसंग्राम शेतकरी आघाडी हि शेतकऱ्यांना गोडवून मध्ये बियाणे वाटप करेन याची दक्षता कृषी अधिकारी व विभागाने घ्यावी बाजारात होणारी बियाणांची होणारी साठेबाजी थांबून शेतकऱ्यांना बियाणे उपलब्ध करून देण्यात यावी तसेच अनेक व्यापारी बाजारात तुलसी कंपनीची कब्बडी, ॲग्रो सिड्स कंपनीचे ७०६७ अशा बियाणांची विक्री ८६४ रू किंमतीची बॅग हि बाराशे, तेराशे रुपये किमतीने कळ्या बाजारात विक्री केली जात आहे कळ्या बाजारात होणारी विक्री तत्काळ थांबवा अशी मागणी शिवसंग्राम शेतकरी आघाडीच्या वतीने जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, सुनील कुटे, राजू सय्यद, रमेश जगताप, लाटे तात्यासाहेब, मोहन गव्हाणे, संपत गव्हाणे, शरद तीपले, विलास मस्के, शैलेश सुरवासे, सचिन आमटे यांनी केली.

## माणसा,माणसा कधी होशील रे माणूस !

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



आजकाल आपण किती निष्पाप जीवांची आगंतुक हत्या करतोत बळी घेतोत.याचे हे बोलके उदाहरण..असंच जर माणसाला आपल्या कुटुंबासह जाळुन कुणी मारले असते तर किती हळहळ वाटली असती.मिडीया किती तुटून पडला असता..पण इथे बोलणार कुणीच नाही..रान जाळणे,जंगल पेटवणे यामुळे किती मुके प्राणी,पक्षी,जिवजंतु मरत असतील याची कुणालाच दया,माया येत नाही.एवढे निष्ठुर काळीज फक्त माणसाचे झाले आहे.हव्यासापायी,हव्यासापोटी, कमवुन कुठे ठेवणार आहेस हे सारे,इथेच ना..मेल्यावर कपाळाला लावलेला ठोकळा काढुन घेतात.कमरेचा करगोटा तोडतात.मग हे पाप कुठे फेडणार,मेल्यावर स्वर्गात जागा हवी म्हणतो.अश्या सडक्यांना नरकात सुद्धा जागा मिळेल का ? जन्माला ला आला हेला पाणी वहाता वहाता मेला..तसे हे.यावर शासनाने कठोर निर्णय घ्यायला हवेत.त्यापेक्षा गावाने,समाजाने असे जो करील.त्याला वाळीत टाकावेत.आपण फक्त म्हणतो ,वृक्षावल्ली आम्हा सोयरे,वनचरे हे म्हणायलाच फक्त बरे वाटते..आचरणात आणायला जड जाते..चुका होतात अनावधानाने पण हे ठरवून केलेले वाईट कृत्य,पाप असते.हे पाप कुठे फेडणार,चारीधाम करतो,काशी करतो मांजर मारलेली सांगत नाही... म्हणूनच कवी म्हणतात अरे माणसा,माणसा कधी होशील रे माणूस ! असचं आज प्रकाश केदारी यांनी टिपलं एक सत्यघटनेवर आधारित क्षणचित्र...!

# मानवत नगर परिषदेच्या वतीने पर्यावरण दिन साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मानवत । प्रतिनिधी**

आज दिनांक ५ जून हा जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्यात येतो. याचेच औचित्य साधून मानवत नगर परिषदेच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन मानवत नगर परिषदेचे मूख्याधिकारी श्रीमती कोमल सावरे यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. यावेळी पर्यावरणा विषय बोलताना श्रीमती सावरे म्हणाल्या की, पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास, वाढते तापमान, वाढते प्रदूषण यासाठी वाढते शहरीकरण औद्योगीकरण तसेच वृक्षतोड, अस्वच्छ परिसर इत्यादी गोष्टी कारणीभूत आहेत. स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी,स्वच्छ पर्यावरण यासाठी वृक्षतोड थांबली पाहिजे व एक व्यक्ती एक झाड या समीकरणाची जोड पर्यावरणाला खूप आवश्यक आहे. चालू वर्ष २०२४ चा विचार केल्यास तापमानाचा पारा ४८ अंश सेल्सिअसच्या वरती गेलेला आहे. या गोष्टीचा विचार केल्यास एका व्यक्तीने दोन झाडे लावणे ही आजच्या काळाची गरज आहे. आणि नागरिकांनी सुद्धा पर्यावरण जतन व संवर्धन करणे खूप गरजेचे आहे. मानवत नगर परिषदेच्या वतीने नेहमी स्वच्छता, प्रदूषण मुक्त शहर स्वच्छ पाणी वृक्ष लागवड इत्यादी बाबीकडे मोठ्या प्रमाणात लक्ष दिले जात आहे. नागरिकांनी आपल्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवावा व प्रशासनात सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी श्रीमती कोमल सावरे यांनी केले आहे. आज जागतिक पर्यावरण दिना निमित्त कार्यालयाच्या वतीने वाटर फिल्टर मानवत या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास पर्यावरण प्रेमी गणेश आप्पा चिंचोलकर यांनी झाडांची रोपे उपलब्ध करून दिली व या कार्यक्रमास स्वतः उपस्थित राहिले. याबद्दल श्रीमती कोमल सावरे यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास मानवत नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी अभियंता सय्यद अन्वर , कार्यालयीन अधिक्षक भगवानराव शिंदे , कर निरिक्षक श्री भारतराव पवार, स्वच्छता निरिक्षक श्री मुंजाभाऊ गवारे, हनुमंत बिडवे, श्री पी आर पवार, श्री.संजय रुद्रवार, लिपिक, श्री महेश कदम, अंतर्गत लेखापरीक्षक, श्री शतानिक जोशी, विद्युत अभियंता,श्री संतोष खरात, संगणक अभियंता,श्री मुंजासा खोडवे, लेखापाल, श्री.संतोष उन्हाळे, कर निरीक्षक, श्री.राजेश शर्मा कर निरीक्षक,श्री.रामराव चव्हाण, कर निरीक्षक, नारायण व्यवहारे, शेख वसीम, श्री.रवी दहे, मनमोहन बारहाते लिपिक,श्री. सचिन सोनवणे, लिपिक, श्रीमती वंदना इंगोले, श्रीमती शितल सोळंके, सुनिता वाडकर, श्री.रावसाहेब झोडपे, विद्युत विभाग, श्री सुनील कीर्तने, स्वच्छता विभाग सहाय्यक,श्री दीपक भदर्गे, श्री यशपाल भदर्गे, श्री जावेद मीर,शाम दहे, श्री रवी कच्छवे, राज भाकरे, बाबासाहेब नंदनवरे यांच्यासह नगर परिषदेचे कर्मचारी उपस्थित होते.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904